27 AUG 2026
पुढारी


# 'मुलगी हवी हो!' : केवळ कन्यारत्न असणाऱ्या पालकांचा आज गौरव

## दैनिक 'पुढारी'चा विशेष उपक्रम; गोविंदराव टेंबे सभागृहात रंगणार सन्मान सोहळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

एक लेक जन्माला येते, तेव्हा केवळ एक अपत्य नव्हे, तर साक्षात एका घराण्याचे भवितव्य, संस्कृती आणि प्रकाश जन्माला येतो. आजची 'ती' आपल्या कर्तृत्वाने आकाशाला गवसणी घालत घराचा आणि देशाचा स्वाभिमान ठरत आहे. समाजात मुलगा-मुलगी भेद नष्ट करून 'मुलगी हाच आमचा अभिमान' हा विचार प्रत्यक्ष जगणाऱ्या पालकांचा सन्मान करण्यासाठी दैनिक 'पुढारी'च्या वतीने आयोजित 'मुलगी हवी हो!' हा विशेष गौरव सोहळा गुरुवारी (दि. २७) रंगणार आहे.

खासबाग मैदानाजवळील गोविंदराव टेंबे सभागृहात (जुना देवल क्लब) सकाळी १०.३० वाजता हा सोहळा पार पडेल. या उपक्रमाचे मुख्य प्रायोजक मे. गोपिनाथ अनंत चिपडे सराफ, भाऊसिंगजी रोड आणि व्हिनस कॉर्नर, सहप्रायोजक सारस्वत को-ऑप. बँक, भंडारी ग्रुप असून व्ही. जे. पाटील फाऊंडेशन आणि जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून महापौर रूपाराणी निकम, कोल्हापूर जि. प. अध्यक्षा शिल्पा खोत असतील. मे. गोपिनाथ अनंत चिपडे सराफच्या श्यामला चिपडे, संजीवनी चिपडे, सारस्वत को-ऑप. बँक कोल्हापूरच्या होलसेल बँकिंग प्रमुख धनश्री काळे, भंडारी ग्रुप कोल्हापूरच्या मंगल भंडारी, व्ही. जे. पाटील फाऊंडेशनच्या संजीवनी पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.





मुख्य प्रायोजक
सोनेरी लँडमार्क
चिपडे
सह-प्रायोजक
Saraswat Bank
Saraswat Co-operative Bank Ltd.
BHANDARI GROUP
विशेष सहकार्य


### कार्यक्रमाचा तपशील

वार व तारीख : आज, गुरुवार, दि. २७ ऑगस्ट
**वेळ : सकाळी १०.३० वाजता**
स्थळ : गोविंदराव टेंबे सभागृह (जुना देवल क्लब), खासबाग मैदानाजवळ, कोल्हापूर

### विशेष व्याख्यान

या सोहळ्यात शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांचे 'स्त्री सक्षमीकरण' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

**कर्तृत्वाला बळ देणाऱ्या पालकांचा सन्मान**

केवळ एक किंवा दोन कन्यारत्नांचे आनंदाने स्वागत करून त्यांना उच्च शिक्षण, संस्कार आणि बळ देत यशाच्या शिखरावर पोहोचवणाऱ्या आदर्श पालकांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते गौरव केला जाणार आहे. हा केवळ सत्कार सोहळा नसून, स्त्री जन्माचे स्वागत करणारी आणि स्त्री सक्षमीकरणाचा नवा अध्याय लिहिणारी ही एक सामाजिक चळवळ ठरत आहे. स्त्री जन्माचा उत्सव साजरा करणाऱ्या आणि समाजाला नवी प्रेरणा देणाऱ्या या प्रेरणादायी सोहळ्यास शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

2 7 AUG 2026

तरुण भारत

# प्रभा गणोरकर, रवी कोरडे यांना 'काळसेकर काव्य पुरस्कार'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'सतीश





काळसेकर काव्य पुरस्कार" ज्येष्ठ कवयित्री प्रभा गणोरकर यांना तर 'ऋत्विज काळसेकर काव्य पुरस्कार" रवी कोरडे यांना जाहीर करण्यात आला असल्याची माहिती डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली. नियतकालिकांच्या संपादन व लघुनियतकालिक चळवळीत सक्रीय सहभाग असणाऱ्या सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार देण्यात येतो. शिवाजी विद्यापीठात लवकरच पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काळसेकर कुटुंबियांच्यावतीने सतीश काळसेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलेल्या देणगीतून काव्य क्षेत्रात मौलिक योगदान देणाऱ्या कवींना 'सतीश काळसेकर काव्य पुरस्कार" देण्यात येतो. रुपये २१ हजार आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तर, आश्वासक कविता लेखन करण्ऱ्या तरुण कवीला 'ऋत्विज काळसेकर पुरस्काराने" सन्मानित करण्यात येते. या पुरस्काराचे स्वरूप १० हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे आहे. काळसेकर काव्य पुरस्काराचे हे पाचवे वर्ष आहेप्रभा गणोरकर यांचे 'विवर्त', 'व्यतीत" व 'व्यामोह" हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. आधुनिक स्त्रीची संवेदनशीलता व तिच्या अस्तित्वाशी निगडीत वेगवेगळे प्रश्न गणोरकर यांच्या कवितेतून अभिव्यक्त झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथील कवी रवी कोरडे यांनी 'धूसर झालं नसतं गाव', 'मुंड्या डोंगरांचे दिवस" हे महत्वाचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.

2 7 AUG 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इतिहासामुळे समाज कसा घडला याची उकल : डॉ. पवार

गडहिंग्लज : प्रतिनिधी

इतिहासाच्या अभ्यासातून समाज कसा घडला, विविध सामाजिक संस्था कशा विकसित झाल्या, राजकीय व आर्थिक व्यवस्थांमध्ये कोणते बदल झाले आणि त्या बदलांचा सामान्य जनजीवनावर कसा परिणाम झाला, याचा मागोवा घेता येतो. त्यामुळे इतिहासाचा अभ्यास हा वर्तमानातील सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील शाहू रिसर्च सेंटरच्या संचालिका डॉ. मंजूश्री पवार यांनी केले.



भडगाव : डॉ. मंजूश्री पवार यांचे स्वागत करताना प्रा. स्वाती कोरी. उपस्थित मान्यवर.

भडगाव (ता. गडहिंग्लज) येथील डॉ. ए. डी. शिंदे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये इतिहास विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या.

प्रा. एस. व्ही. चव्हाण यांनी स्वागत केले. प्रा. एस. टी. दुंडगे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी डॉ. पवार यांनी, इतिहास म्हणजे केवळ भूतकाळ नव्हे, वर्तमान समजून घेण्याची दृष्टी आहे. इतिहास म्हणजे केवळ राजे-महाराजे, युद्धे, तारखा आणि घटना यांचा संग्रह नसून मानवी समाजाच्या परिवर्तनाची, संघर्षाची, विचारांची आणि विकासाची जिवंत प्रक्रिया आहे, असे सांगितले. यावेळी त्यांनी शिलालेख, ताम्रपट, सनद, पत्रव्यवहार, सरकारी कागदपत्रे, दप्तरखाने, वर्तमानपत्रे, नाणी, वास्तू, स्मारके, लोकपरंपरा आणि मौखिक इतिहास यासारख्या विविध साधनांच्या आधारे इतिहासाची पुनर्रचना केली जाते याची माहिती दिली.

कार्यक्रमास संस्था सचिव स्वाती कोरी, प्राचार्य डॉ. डी. व्ही. घेवडे, प्रा. किशोर जोशी, डीन ॲकॅडमिक डॉ. ए. जे. जाधव यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. एस. एम. खान यांनी आभार मानले.